प्रेसनोट दि:१० /०७/२०१८

देशी बनावटीचे एक पिस्टल, एक जिवंत काडतूसे

युनिट १ गुन्हे शाखेच्या टिमने केली हस्तगत.

गुन्हे शाखेच्या युनिट १ पथकाने वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पो. निरीक्षक श्री. नितीन भोसले पाटील, यांचेसह युनिट १ गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी वाहन चोरीचे व घरफोडीचे गुन्हयातील आरोपींचा शोध घेत असतांना पोना.२२९७ सचिन जाधव यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, एक इसम कोरेगावपार्क पोलीस ठाणेचे हद्दीत त्याचेकडील बेकायदेशीर शस्त्र जवळ बाळगून साऊथ मेन रोड,कोरेगाव पार्क,पुणे येथे सार्वजनिक रोडवर थांबला आहे.

त्यानूसार युनिट १ च्या पथकाने सदर ठिकाणी छापा मारुन आरोपी नामे अनिल अरुण कांबळे वय २१ वर्षे, रा.गणपती मंदीराजवळ,आव्हाळवाडी,वाघोली,पुणे यास सापळा रचून पकडून त्याचेकडून ०१ देशी बनावटीचे पिस्टल, ०१जिवंत काडतूस असा एकूण ५०,१००/- रु. किंमतीचा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे सो. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पंकज डहाणे सो. पोलीस उप आयुक्त, गुन्हे. श्री समिर शेख सो. सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितिन भोसले-पाटील, पो उप निरी. हर्षल कदम, दिनेश पाटील, पो.ना. सचिन जाधव, इम्रान शेख,इरफान मोमीन, पोहवा.रिजवान जिनेडी,गजानन सोनुने,श्रीकांत वाघवले,तुषार मालवदकर,राजु पवार, सुधाकर माने,प्रकाश लोखंडे, मेहबुब मोकाशी, अशोक माने, पोना.तुषार खडके, सुभाष पिंगळे, प्रशांत गायकवाड, यांनी केली आहे